# वैश्विक एकात्मतेकडे नेणारा एक मार्ग...✍

## सदाचरण

**शिष्य :** होय महाराज! त्यानंतर काय?




**सद्गुरू :** दुसऱ्या पायरीला हे मूलाज्ञान फुगीर व वक्र झाले. त्यातून दोन अवस्था निर्माण झाल्या, एक आहे **'स्वयंप्रकाशावस्था'** (महाकारण) आणि दुसरी आहे **'संभ्रमावस्था'** (कारण). बिंदुरूपाला सन्मुख असलेली बाजू (कड) आहे. आपल्या स्वरूपाची आठवण असलेली, ती **'स्वयंप्रकाशावस्था'** (महाकारण) म्हटली गेली. स्वयंप्रकाशावस्थेत विद्यातनुत राहणाऱ्या देवाचे नाव आहे **'परमात्मा'** (परमेश्वर, ज्ञानात्मा) आणि अविद्यातनुत राहणाऱ्या देवाचे नाव आहे **जीवेश्वर** (अंतरात्मा, ईश्वर). सिद्धांताची आठवण असू दे. मूळातील वस्तू एकमेव, अद्वितीय, निष्क्रीय, परब्रह्म वस्तूच आहे. इथून जगत् रचनेला सुरुवात झाली.

स्वयंस्फूर्तीने घुसळल्या गेल्यावर अविद्यातनुधारी जीवेश्वर तीन गुणात, विभागल्या गेला आणि एकदम पाची सूक्ष्म भूते निर्माण झाली. हाच तो (जगन्निर्माता) **'ॐ'**देव **'स्वयंप्रकाशावस्थेत'** आल्याने त्रिपुटी तयार झाली.

**शिष्य :** त्रिपुटी कशी निर्माण झाली?

**सद्गुरु :** स्फुर्णा झाली आणि झालं काय की, खाली ब्रह्म,वरही ब्रह्म आणि मूलाज्ञान मध्यभागी. या मूलाज्ञानामुळेच भोवरा झाला आणि भ्रम झाला. तत्क्षणी स्फुर्णेतून **'अहंब्रह्मास्मि'** ध्वनि झाला. हाच पहिला कण (बिंदू, ॲटम) ATOM. याचा अर्थ एकटा → घुसळण निर्माण → अपारदर्शी कण आनंदसागरात.

**शिष्य :** भोवऱ्यात हा कण तसाच्या तसा राहिला कसा? आनंद सागरात तो विरघळून कसा नाही गेला?

**सद्‌गुरु :** अरे, जगन्निर्मितीच्या पूर्वीच्या अनेक विविध प्रयत्नात असे (कण विरघळणे) झाले. तुला माहित आहे का (आजही) नवनिर्मितीमध्ये आपण काय करतो की जुन्या चुका किंवा दोष दुरुस्त करतो. चुका नवनिर्मितीत परत परत केल्या जात नाहीत. अगदी त्याचप्रमाणे या वेळी मूलाज्ञानाने अर्थात मायोपाधी ईश्वराने, की जो विश्वनिर्मितीचा अधिकारी आहे, त्याने निर्मितीची आपली ढब(रीत) बदलली. त्याने क्षणभर विश्रांती (Pause) घेणे सुरू केले त्यामुळे परब्रह्म त्या त्या टप्प्यामध्ये सहभागी झाल्याचा आभास निर्माण झाला. परब्रह्माचे स्थिरत्व हे लक्षण ईश्वराला पुढच्या टप्प्यामध्ये सहाय्यभूत झाले आणि प्रत्येक बिंदू (अणू) आनंदसागरात न विरता तसाच राहिला. या बिंदूने काय केले तर सुखासाठी पुढे पाहायला सुरुवात केली.

**शिष्य :** पण महाराज! जर बिंदू आनंदाचा बनलेला होता तर तो सुखासाठी पुढे का पाहू लागला?

**सद्‌गुरु :** अरे! माझ्या लाडक्या! भोवऱ्यामुळे सभोवती बिंदूला रिकामी जागा भासू लागली.

**शिष्य :** महाराज! रिकामी का बरे? परब्रह्म जर तेथे सर्वत्र सम भरलेले होते तर बिंदू भोवती रिकामी जागा असूच शकणार नाही. असे नाही का?

**सद्‌गुरु :** फारच छान! माझ्या बाळा, लक्षपूर्वक ऐक मी तुला ते समजावून सांगतो. शाळेत चाललेल्या त्या तीन मुलांकडे पाहा. तू त्यांना ओळखतोस का?

**शिष्य :** होय महाराज! मी त्यांना पाहू शकतो आणि मी त्यांना ओळखतोही! उजव्या बाजूचा वसंत आहे, मधला शरद आहे आणि उरलेला तिसरा हेमंत आहे. आता त्यांच्याबद्दल काय सांगू इच्छिता?

**सद्‌गुरू :** त्यांचे निरीक्षण करताना, त्यांच्या स्थूलतेविषयी तू काय म्हणशील?

**शिष्य :** हेमंत ठीक आहे. शरद हा हेमंतपेक्षा थोडा जास्त जाडा आहे. वसंत मात्र वयाच्या मानाने फारच जाडा आहे.

**सद्‌गुरू :** ठीक आहे! आता जा आणि त्यांना एकेकाला हाच प्रश्न विचारून ये.

(शिष्य जातो आणि विचारतो.)

पान नं. ७ वर

# गुंजारव

- सौ. प्रतिभा गोखले

मनुष्य जन्माचे सार्थक कराना।
सद्‌गुरूसी शरण जाऊनी, मी कोण जाणा।।धृ।।
आहार, विहार, निद्रा, मैथुन हे पशू लक्षण।
विवेक विचार खास नराचेच लक्षण।
सारासार विचारे, त्यागी देह मी कल्पना।
देह मी माझा म्हणता भोग यम यातना।।१।।
देह त्रयाहून तू अगदी निराळा ना?
मी माझे कर्ता भोक्ता, पहिले सोडा ना।
माता-पिता गणगोत, अंती कोणी ना येई।
सारे प्रवासी घडीचे, कुणी कुणाचे नाही।।२।।
फक्त सद्‌गुरु कदापी संगत सोडी ना।
धर्म, अर्थ, काम, मोक्ष चार पुरुषार्थ।
गुरुकृपे मोक्ष पावूनी होई कृतार्थ।
नाहीतर उभा जन्म गेलाच व्यर्थ।।३।।
माधुरीनाथे कृपा केली, उघडले मोक्षद्वाराला।
प्रतिभासी बरवा निजलाभ झाला।
मुक्ती सुखासाठी तुम्ही ही गुरुगृही जाणार ना?
आलीया जन्माचे सार्थक करणार ना?।।३।।

- अविनाश पाठक

आम्ही दत्ताचे पिसाटले कुत्रे। कधी ह्या वाचा, कधी त्या वाचा।।
स्थूळाचे तोडूनी लचके। सूक्ष्माचे पितो पाणी।।
कारण रात्री भुंकोनी। ज्ञानी मालका रक्षितो।।
ॐकार द्वारी बैसीतो। ध्येय गुरुभक्ती साधतो।।
आनंद गोत्री अविनाशी।। माधुरी त्रयशक्ती भोगितो।।

# गोजिरवाणी...✍

**- सौ. नीता कुलकर्णी**

**आजी** - आज मी तुम्हाला महादेव नावाच्या एका मुलाची गोष्ट सांगणार आहे.

**मुले** - सांग ना आजी!

**आजी** - एकदा तो एकटाच कॅरम खेळत होता. समोरच त्याची आजी बसली होती. आजीने विचारले, ''अरे, एकटाच काय कॅरम खेळतोय? भिडू नको का खेळायला?''

**मुले** - मग तो काय म्हणाला?

**आजी** - तो म्हणाला, ''अगं आजी, माझा डावा हात म्हणजे मी आणि उजवा हात म्हणजे माझा मित्र असं मी ठरवलंय!''

**मुले** -मग पुढे काय झाले?

**आजी** - अरे व्हायचे काय, तो सारखा सारखा हरू लागला व मित्र जिंकू लागला. वैतागून महादेव आजीला म्हणाला, ''छे! सारखा मीच हरतोय!''

**मुले** - मग आजी काय म्हणाली?

**आजी** - आजी म्हणाली, ''अरे! त्यात काय मोठं? आता तू म्हणजे उजवा हात आणि तुझा मित्र म्हणजे डावा हात असं ठरव नी खेळ!''

**मुले** - मग त्याने काय केलं?

**आजी** - तो म्हणाला, ''नाही, मी आधी ठरवलंय ना की मी म्हणजे डावा हात खेळतोय, मग मी त्यात बदल करणार नाही. भले हरलो तरी चालेल, पण मी फसवणूक करणार नाही.'' आजीने त्याच्याकडे कौतुकाने पाहिले. पुढेही तो म्हणाला, ''आजी, डावा हात नी उजवा हात दोन्ही हात माझेच ना! म्हणजे मीच तर जिंकतोय सारखा सारखा!'' मुलांनो तुम्हाला माहित आहे का महादेव म्हणजे कोण?

**मुले (उत्सुकतेने)** - कोण आजी?

**आजी** - अरे, हाच महादेव मोठा होऊन न्यायमूर्ती रानडे झाले. सांगा बरं, तुम्हाला त्याच्यात कोणते गुण दिसले?

**मुले** - तो एकटा असूनही खरे खरे खेळत होता.

**आजी** - बरोबर! म्हणूनच तर मोठा होऊन स्थिर बुद्धीने तो न्यायदेवतेची उपासना करू शकला आणि बरं का, मुलांनो डावं, उजवं ही दोन्ही आपलीच अंगे आहेत हेही त्याला समजले होते.

**मुले** - गुरुमाऊलीही आपल्याला हेच शिकवते ना!

**आजी** - अगदी बरोबर! जीवन जगतानाही आपली अशीच हार-जीत होतच असते. अशावेळी आपण गोंधळात पडतो. जिंकण्या-हरण्यात अडकून बसतो. हेच सर्व खरे की काय या आशंकेत बुडतो. तेव्हा माऊली आपल्यावरील अज्ञानाचा पडदा दूर करते व हार-जीत ही दोन्ही तुझीच अंगे आहेत व तू त्या पलिकडील आहेस याचा बोध करते.

◈◈◈

---

**पान नं. ४ वरून**

**शिष्य :** (वसंताला) तुझ्या स्थूलतेविषयी तुला काय म्हणायचे आहे?

**वसंत :** अहो काका! मी काही जाडा नाही! मी ठीक आहे. शरद माझ्यापेक्षा बारिक आहे आणि हा हेमंत तर अगदी काठीच आहे.

**शिष्य :** ठिक! ठिक!! एकमेकांना चिडवू नका. माझ्या सद्‌गुरुदेवांना मला काय समजावयाचे आहे ते मी समजलो. (शिष्य परत येतो) मी समजलो महाराज! त्या सापेक्ष गोष्टी आहेत पण आपण काय सिद्ध केलेत?

पण परब्रह्म जर सर्वत्र सम पसरलेले होते तर पोकळी असूच कशी शकते?

**क्रमश :**

# भक्तगाथा...✍

हगवणीच्या आजारामुळे बलभीमास अशक्तपणा बराच आला होता. तरी त्याचे भजन-पूजनादि नित्यक्रमात काही अंतर पडले नाही. एके दिवशी रात्री जेवण झाल्यावर आपला मुलगा दत्ता यास मांडीवर घेऊन सहज बसला असता त्याचे मनात काही गहन विचार चालू होते. इतक्यात पत्नीने जवळ येऊन त्यास मोठ्या विनयाने विचारले, ''नाथ! आपण आज कोणत्या विचारात गर्क झाला आहात?' बलभीम विचारात गर्क असल्याने त्यास कशाचेच भान नव्हते. पत्नीने पुन्हा त्यास स्पर्श करून विचारले. त्यावेळेस त्याने मान वर केली व 'काय?' म्हणून विचारले. यावेळेस पत्नीचा प्रश्न ऐकून तो थोडा वेळ स्तब्ध बसला. आजपर्यंत आपल्या पत्नीपासून कोणतीही गोष्ट बलभीमाने लपवून ठेवली नव्हती. आत एक बाहेर एक, असा त्याचा स्वभावच नसल्याने जे खरे खरे विचार त्याच्या मनात चालू होते ते त्याने तिला निवेदन केले. तो तिला म्हणाला,

''परमेश्वराने आपणास बुद्धी दिली आहे. तिचा योग्य उपयोग करणे हे आपले कर्तव्य आहे. या बुद्धीच्या सहाय्याने आपण सारासार विचार केला पाहिजे. सूक्ष्म विचार केला असता आपणास असे आढळून येईल की,

१) आपले हे शरीर आपल्या आधीन मुळीच नाही. जर हे स्वाधीन असते तर ते आपली इच्छा नसताही मृत्युमुखी अगर नानाविध रोगांच्या तडाख्यात सापडलेच नसते. देह हा खरोखरीच नाशवंत दु:खरूप व परतंत्र आहे. पहा, मी नाना प्रकारची औषधे घेतली. पण गुण आला नाही व या देहाच्या नादी लागून सुखही मिळाले नाही व कधी मिळणारही नाही. शरीर हे श्री ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे आहे.

***क्लेशतरुंची वाडी। जे तापत्रयग्नीची सगडी।***
***जे मृत्युकाकासी कुरोंडी। सांडिली आहे।।***
***जे दैन्याचे दुभते। जे महाभयाते घटविते।***
***जे सकळ दु:खांचे पुरते भांडवल आहे।।***

२) त्याचप्रमाणे 'पैसा' हा ही मनुष्यास दुःखरूप व त्रासदायकच आहे. धन जवळ असेल तरी दुःख, नसले तरीही दुःखच, जवळ असले तर ते कोणी चोरून अथवा फसवून नेईल की काय ही भीती व नसले तर ते कसे मिळवावे या संबंधीची रात्रंदिवस काळजी, शिवाय ते मिळविण्यास ही कष्ट व खर्च करतानाही 'आये दुःख व्यये दुःखं दुःखं धिगर्याः कष्टसंश्रिताः' या वचनाप्रमाणे स्थिती आहे.

३) देह धनाप्रमाणे स्त्रीपुत्र आदिकरून प्रत्येक वस्तुचा विचार केला असता असे आढळून येईल की, सर्व जगच नश्वर व दुःखरूप आहे. जोपर्यंत आपली सांपत्तिक व शारिरीक स्थिती उत्तम असते तोवर सर्व आप्तइष्ट प्रेम करतात. परंतु शरीर रोगग्रस्त झाले तर आपल्या कोणीही उपयोगी पडत नाही. सुखप्राप्तीसाठी मनुष्य विषयाचे पाठीस लागतो. पण सुख न होता उलट दुःखच होते. खरे सुख कशात आहे हे कळत नाही. म्हणून मला वाटते की अशाश्वत दुःखरूप अशा या इहलोकाप्रत येऊन काहीतरी आपल्या जीवाचे सार्थक करावे. आपण हा देह अतःपर परमार्थ साधण्यातच घालवावा. इतर कोणत्याही प्रापंचिक कार्यात घालवू नये. आजपर्यंत प्रपंच करून पाहिला. त्यात काहीच अर्थ नाही, असा स्वानुभव आला. आता यातच किड्याप्रमाणे सक्त होऊन रहाणे हे अगदी अयोग्य आहे. श्री यशवंत महाराजांनी सांगितल्याप्रमाणे आपण कोठेतरी परगावी जाऊन भिक्षावृत्तीने राहून संतसमागम जोडून जन्माचे सार्थक करून घेणे हेच श्रेयस्कर आहे.''

वरील सर्व उपदेश साध्वी कृष्णाबाई निमूटपणे ऐकत होती. पतिच्या अंतःकरणात पूर्ण विरक्ती झाली आहे हे तिने ताडले. संसारात जन्मोजन्म खितपत पडण्यापेक्षा सद्गतीसाठी याच जन्मी जीवापाड खटपट करणे हे श्रेष्ठ आहे अशी तिचीही खात्री झाली.

कृष्णाबाई श्रद्धाळू व सात्त्विक मनाची असल्यामुळे तिला पतिचे सर्व बोलणे रूचले व तिने त्यास आपली पूर्ण संमती दर्शविली.

**क्रमशः**

# विकाराकडून निर्विकाराकडे...✍

मुक्ता

## मरण नव्हे तरण !

रस्त्यात जाताना ओळखीचे एक सद्‌गृहस्थ भेटले ते म्हणाले,''अहो, कळलं का तुम्हाला आपल्या कॉलनीतले जोशी काल गेले.'' तसे त्यांना म्हटले,''अरेरे! आजारी होते का ते ?'' तेव्हा ते म्हणाले,''छे! हो! अगदी ठणठणीत होते. हार्ट फेल झाले. अहो, तुम्हाला माहित आहे का त्यांचे भविष्य अगदी तंतोतंत खरे झाले.'' तेव्हा चमकून विचारले, ''कसले भविष्य ? कुणी सांगितले ?'' तेव्हा ते म्हणाले,''अहो, एका ज्योतिष्याने त्यांना येत्या महिन्यात जीवाला धोका आहे असे सांगितले होते.'' खोलात जाऊन त्यांना विचारले ''काय डोक्यात घेतले होते का ते ?'' तेव्हा ते सद गृहस्थ म्हणाले,''अहो काय विचारता, त्यांच्या डोक्यात सारखे तेच होते. म्हणायचे देखील आता माझे काही खरे नाही.''

अहो ही मरणाची उर्मीच विलक्षण आहे. ती येते आणि सगळी यंत्रणाच बिघडवून टाकते. या उर्मीरूपी वादळात अडकून सूक्ष्म देह स्थूळ देहाला सोडतो.

अजूनही एक उदाहरण डोळ्यासमोर तरळून गेले. मुलुंडला राहणाऱ्या देशपांडेंना पण असेच भविष्य एका ज्योतिष्याने सांगितले होते. परंतु त्यांच्या मुलीचे लग्न व्हावयाचे होते. तेव्हा ते म्हणाले, ''मुलीचे लग्न होईपर्यंत मी डोळे मिटूच शकत नाही.'' इथे मात्र त्यांच्याबाबतचे वर्तवलेले भविष्य खोटे ठरले. कारण त्यांना मृत्यूच्या उर्मीने घेरलेच नाही.

आपण पाहतो ही रोगाच्या शेवटच्या अवस्थेत, मृत्यूच्या दाढेत अडकलेल्या व्यक्ती मृत्यूला पाठ फिरविताना दिसतात. तर काही जणांना एखादे वर्तवलेले भविष्य किंवा नकारात्मक विचार या उर्मीला बळी पाडतो. हे असे का व कसे होते ? मूळात स्थूळ देह हा नाशिवंत आहे हेच पचनी पडत नाही. तो यमाचा घास आहे याची

जाणीव असतेही, पण त्याबरोबर स्थूळ देह माझा किंवा मीच वाटल्याने सतत भीती वाटत रहाते. अशातच काही नकारात्मक गोष्टींमुळे ही मरणाची उर्मी येते.

मध्यंतरी 'स्वाईन फ्लू' या आजाराचे सावट सगळीकडे पसरले होते. तेव्हा अनेकांना या उर्मीने घेरले होते. कालांतराने या रोगाची लस बाजारात आल्यावर या उर्मी थांबवता आल्या.

अनेकदा अनेक वृद्ध लोकांना जीवन नकोसे होऊन मृत्यू आलेला आपण पहातो. इथेही मरणाची उर्मीच त्यांना आलेली असते. तर त्याच वयातील काही जण मात्र आनंदाने आयुष्य व्यतित करताना दिसतात.

मग ही उर्मी येते कशी? खरं तर ही उर्मी सूक्ष्म देहातच उठलेली असते. चित्तात त्याचे चिंतन होत असते. त्यामागे कुठलाही नकारात्मक विचार असू शकतो. तो परिस्थितीजन्य ही असतो किंवा विकारात्मक असतो. स्थूळ देहाच्या अंगाने आलेली ही उर्मी मात्र आपण परतवू शकतो म्हणजेच आयुष्यातील **गंडांतर आपण टाळू शकतो.**

सूक्ष्म देहही कधी कधी मनासारखे न होण्यामुळे किंवा इतर काही नाराजीमुळे शून्यात अडकतो. इथे सूक्ष्म देहाचे व्यवहार थांबावेसे वाटतात. ह्या ठिकाणी स्थूळ देहाच्या मरणाची उर्मी नसून सूक्ष्म देह क्रियाशून्य बनतो, कारण देहात अडकतो. मन बुध्द्यादीकांना चालना मिळत नाही. जीवनातील चैतन्य, उत्साह नाहिसा होतो. याला आपण 'डिप्रेशन' असेही म्हणतो. सूक्ष्म देहाला आलेली ही उर्मीही आपण परतवू शकतो.

आपण फ्युज वायरचा उपयोग जाणतोच. अधिक लोड पडल्यावर फ्यूज वायर स्वतः जळून उपकरणाची हानी होऊ देत नाही. तसेच सद्‌गुरू उपासना या आपल्या आयुष्यात फ्युज वायरचे कार्य करतात. मरणाच्या उर्मी म्हणजेच अधिक प्रमाणात येणारा लोड ही उपासना आपली यंत्रणा बिघडू देत नाहीत. संरक्षक कवच्याप्रमाणे

कार्य करतात. अशा उर्मी आल्यातरी सद्गुरुवचन आपल्याला मायेपासून लांब ठेवते व या उर्मी परतवू शकते.

याचे उदाहरण प्रत्यक्ष घडलेले पाहिले आहे. एका शिष्यास असेच भविष्य ऐकायला मिळाल्यावर गुरुमाऊलीने त्यास आपल्या जवळ गंडांतर टळेपर्यंत ठेवून घेतले व नरदेह गमावण्यापासून वाचवले. म्हणूनच सद्गुरु उपासनेला आपल्या जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे.

मूळात जीव हा अविद्यात्मक असतो. त्यास तुझे-माझे, आप-पर, मित्र-शत्रू, सासर-माहेर अशा अनेक द्वैत भावना असतात. त्यास अविद्येमुळे समदृष्टी लाभलेली नसते. परंतु महाराज जीवाला कारणदेहातून अलगद बाजूला करतात. महाकारणाचे वस्त्र परिधान करतात. त्यामुळे संकुचित वृत्त्या नाहिशा होतात. विशालता व्यापकता येते. मी छोटासा एवढासा, देहाएवढा हा गैरसमज दूर होतो. त्यामुळे डिप्रेशन्स येतच नाहीत. असा जीव चौऱ्याशींच्या फेऱ्यातही अडकत नाही. त्याचा सूक्ष्मदेह हा निर्विकार असतो व **मरणाऐलिकडेच मेला** अशी जीवन्मुक्ताची अवस्था प्राप्त करतो व खऱ्या अर्थाने **मरण** न होता **तरण** होते.

आतापर्यंत आपण क्षुधा, तृषा, शोक, मोह व जरा या उर्मींचा विचार केला होता. मरण ही उर्मी मात्र टोकाचा नाश करू शकते. हातातील स्थूळ देहही गमावण्यापर्यंत घातक ठरू शकते. म्हणूनच सद्गुरू उपासनेच्या सहाय्याने आपण या उर्मीपासून नुसते लांबच रहात नाही तर खऱ्या अर्थाने तरून जातो.

◈◈◈

‘वृत्ती’ म्हणजे इच्छा! ती फार बलवान आहे. सारखी इकडेतिकडे धावत असते. जबरदस्तीने तिला गुरुदेवांकडे वळवावी लागते. परमार्थाची एकदा गोडी लागली की वृत्तीचे बाह्य फिरणे थांबते व ती अंतर्मुख होते.

**- श्रीसस भागीरथीनाथ**

# अहो ऐकलत का?...✍

**सौ. प्राची**

## आशंका निवृत्ती

''अनघा, ए अनघा आल्या का गं मावश्या दासबोध वाचायला?'' निर्मला रस्त्यावरूनच केकाटली. '' ही अशी रस्त्यावरून का जाहिरात लावल्यासारखी कोकलते?'' अनघा कुरकुरली. ''जरा दोन पावलं घरात यायला पाय मोडतात का?'' अनघा पुटपुटली अन् मोठ्याने केकाटलीच, ''आत येऊन पाहा, तुझ्याशिवाय सगळे हजर आहेत!''

''अय्या? हो का? मला वाटलं होतं दासबोधाचं वाचन म्हटल्यावर एवढं कोणी इंटरेस्ट घेणारच नाही!'' निर्मलेने सूर लावला,''मला किनई मागच्या वेळी वेळच नाही झाला घरातल्या कामाच्या पुढं!''

आसावरी दबक्या आवाजात बोलली,''तुझं नेहमीच रडगाणं बंद कर गं! आता सगळ्या बायका आलेल्या आहेत. जरा चारचौघासारखं शिस्तीने वागायला शिका!'' ''ए, असं काय गं ताई? रागावतेस कशाला? ते एटीकेटस मॅनर्स नाही बाई मला जमत!'' निर्मला. ''शिका मग! शिका, आतातरी शिका!'' आसावरी फिस्कारली.

''काय ग तुमच्या बहिणी-बहिणीचं काय प्रेम उतू चाललंय?'' सौम्य स्वरात त्यांच्या वादाला पूर्ण विराम देत ललिता उद्गारली. ''अगं, आज पाहिलस का आपल्याकडे कोण कोण आलंय ते?'' ''कोण गं? कोण गं?'' - निर्मला ने पृच्छा केली आणि आश्चर्याने म्हणाली, ''अय्या तू? चक्क नगरवरनं इथे आलीस? आम्हाला मेल्यांना इथल्या इथे नाही हो जमत यायला!''

''बुद्धीचा निश्चय असल्यावर सगळं काही जमतं! हो की नाही गं ललीता?'' आसावरी निर्मलाला माहिती पुरवित म्हणाली,''ए निर्मला, सुमतीचा खूप अभ्यास आहे बरं का या विषयावरचा!''

‘‘अभ्यास खूप म्हणजे काय गं? आता काय शाळेतल्यासारखं वह्या-पुस्तकं घेऊन दासबोधाचा अभ्यास करायचा की काय? मला बाई, कंटाळा येतो अभ्यासाचा! मुळात चष्मा लावायचाच कंटाळा येतो! वाचन करायचं म्हटलं की शोधा चष्मा!’’ इति निर्मला. लगबगीने आसावरी उद्‌गारली, ‘‘हो बाई, मला देखील चष्मा लावायचाच कंटाळा येतो! पर्स काढा रे, चष्म्याचे घर काढा रे, चष्मा काढा रे, आणि जास्ती वाचायला लागलं की डोकच दुखतं!’’

‘‘अय्या! म्हणजे लेखन आणि वाचन हे मुद्दे स्पष्ट करून सांगणारी रामदासी बुवांची प्रवचन एवढ्यात विसरलात वाटतं! यासाठीच गुरूमुखाने श्रवण करण्याचे महात्म्य आहे!’’ इति ललिता.

‘‘म्हणजे काय गं मावशी?’’ - इति अनघा,‘‘अगं, आपल्याला गुरुदेवांनी सांगितलेले अनुभवाचे बोल पटकन् कळतात आणि लक्षपूर्वक ऐकले असेल तर आत्मसातही होतात. ती, ती गोष्ट अंगी बाणून जाते, दुसऱ्या कोणाकडून ऐकले किंवा आपले आपण ग्रंथ वाचले तर शब्द फक्त माहिती होतात पण त्याने आपला अभ्यास मात्र वाढत नाही’’ ‘‘अभ्यास वाढत नाही म्हणजे नक्की काय गं मावशी?’’ अनघाने विचारले.

‘‘सर्वसाधारण जीवाला आपल्या ब्रह्मत्त्वाचा विसर पडलेला असतो. विधीवत शरण गेल्यानंतर गुरूमहाराज जीवाला ‘तत्त्वमसि’चा बोध देऊन त्याच्या ब्रह्मत्त्वाची जाणीव करून देतात. अर्थात आत्मज्ञान देतात. जीवाला चौऱ्यांशी लक्षातून फिरता फिरता **‘देह मी’** ची सवय (अर्थात् अभ्यास) दृढ होऊन बसलेली असते. ती सवय बदलून **‘ब्रह्म मी’** ची सवय लावून घेणे, त्यासाठी सतत प्रयत्नशील राहाणे, हाच अभ्यास! त्यासाठी चष्मा किंवा पुस्तके लागत नाहीत. अगं अनघा, त्यासाठी वयाची देखील विशिष्ट अट नाही बरं का! कित्येक छोटी मुले अगदी लहानवयात येतात हो मंदिरात आणि कशी चट्‌चट् शिकत असतात महाराजांच्याजवळ! लहान मुलांचं मन निर्मळ असतं! त्यामुळे ती पटापट शिकतात. त्यांना सर्व गोष्टी भराभर आत्मसातही होतात.’’

अनघा म्हणाली ‘‘ए मावशी, माझी क्लासची वेळ झाली, इथेच थांबवू या कां? मला उद्या सांगशील, यातलं सगळं! मी क्लासला गेल्यानंतर तुम्ही बोलत बसलात तर मला कळणार नाही, तुम्ही काय वाचलत ते?

मला थोडा थोडा इंटरेस्ट यायला लागलाय! ए प्लिज गं मावशी!’’

‘‘ठीक आहे.’’ इति ललिता.

अनुज आणि ऐश्वर्या एका सुरात म्हणाले ‘‘अनघाताई तू क्लासवरून आलीस ना की मंदिरातल्यासारखी आपण सापशिडी खेळू या नाहीतर पत्ते खेळू!’’ ‘‘चालेल!’’ घाईघाईत अनघा उद्गारली आणि क्लाससाठी निघून गेली.

अनघा गेल्यावर ललिता म्हणाली,‘‘आता आपण दोन भजनं म्हणू. पहिलं ‘मी कोण आहे, देह किंवा देही’ आणि दुसरं ‘हा मैं कौन हूँ! सच्चिदानंद!’ ’’

अनुजने विचारले, ‘‘ए मावशी, एक शंका आहे गं! उद्याच्या प्रवचनामध्ये **‘आशंका-निवृत्ती’** हा विषय आहे. यामध्ये **शंकेलाच आशंका** म्हटलयं का? की शंका आणि आशंका यात काही फरक आहे?’’ ‘‘छान प्रश्न विचारलास! शंका आणि आशंका एक नाहीत. आपण वास्तविक ब्रह्मरूप असता, गुरुमुखाने आपल्या ब्रह्मत्त्वाचे ज्ञान झाल्यानंतरही साधकाला ब्रह्मत्त्व अंगी बाणवताना आलेल्या अडचणी दूर करण्यासाठी विचारलेले प्रश्न म्हणजे आशंका आणि व्यावहारिक जगातील येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी विचारलेल्या प्रश्नांना शंका हे नाव आहे. गुरुमहाराज आशंकांचे समाधान मोठ्या आवडीने करतात. त्यालाच म्हणतात **‘आशंका निवृत्ती!’’**

◈◈◈

दर गुरुवार आणि एकादशीला मंदिरामध्ये कथा असते. याखेरीज नित्य, नैमित्तिक सणाच्या दिवशी कथा असते. परंपरेतील गुरुमहाराजांच्या जयंती, पुण्यतिथीच्या दिवशी कथा असते.

**सबाह्य अभ्यंतरी अवघा व्यापक मुरारी**

# हरी पाहिला रे....✍

**सौ. रेश्मा**

माऊलींचा सहवास भरपूर लाभला. हे सुद्धा तिच्याच कृपेमुळे आणि असीम, निरपेक्ष प्रेमामुळेच! सहवासातले ते सुगंधी क्षण आठवतात आणि वाटतं अरे, आपल्याला काय बहाल केलं आहे आपल्या माऊलीनं! लग्न ठरल्यावर सहवास मिळणार नाही म्हणून वाईट वाटत होतं, पण माऊली तर प्रत्यक्षात आपल्या किती जवळ आहे, किंबहुना ती दूर कुठेही नाही तर आपल्यातच आहे. अगदी स्मरणमात्रे हजर!

माऊलीबरोबर बऱ्याच ठिकाणी उत्सवाला जाण्याचा योग आला. माऊली स्वतः इतक्या सहज वागत असते, त्यामुळे त्यावेळी ज्या घटना घडल्या त्या बऱ्याचदा सहज वाटल्या. पण आता समजतयं की त्या घटनांद्वारे माऊलीने आपल्याला बोट धरून परब्रह्माची एक एक लक्षण अंगी बाणवून दिली. त्यातलाच एक गोंदवल्याचा किस्सा सांगावासा वाटतो.

आम्ही २००३ साली गोंदवल्याला उत्सवाला गेलो होतो. माऊलीने सगळ्यांच्या शाळा कॉलेजच्या परीक्षा आटोपल्यावर उन्हाळ्याच्या सुट्टीत उत्सवाचं बोलावणं स्विकारले, जेणेकरून सगळ्यांना उत्सवाचा आनंद लुटता येईल.आमचा जवळ जवळ २४-२५ जणांचा चमू गुरुमाऊलींबरोबर गोंदवल्याला दाखल झाला.

पहिल्याच दिवशीची घटना! एक शिष्य अतिशय बावरलेल्या, घाबरलेल्या अवस्थेत माऊलीजवळ आला व आपली पुतणी हरवल्याचे सांगू लागला. माऊली थोडा आवाज चढवूनच म्हणाली,''मी काय ज्योतिषी आहे, तुझी पुतणी कुठे आहे ते सांगायला?'' पण त्या शिष्याचा भाव काही औरच होता. त्याने तिचे पाय धरले व डोळ्यात पाणी आणून सांगितले,''तूच आमचा देव आहेस. आम्ही दुसऱ्या कोणाला मानत नाही. मग आमचं दु:ख आम्ही कोणाला सांगणार?'' माऊली कनवाळूच असते. फक्त भक्ताची कसोटी, भाव, सच्चेपणा पहायचा असतो. क्षणाचाही विलंब न करता तिने हाताच्या खूणेने सांगितले,''या दिशेने जा, तुझी पुतणी सापडेल.'' ती चकव्यात फसली आहे.

मी चार वाजता कथेला उभे रहाण्याआधी ती सापडल्याची बातमी घेऊन ये!'' आणि काय आश्चर्य ती व्यक्ती तीन सव्वा तीनच्या दरम्यान हसतमुखाने पुतणी सापडल्याची बातमी घेऊन आली.

आम्ही सर्व तरुणमंडळी बारकाईने पहात होतो. चमत्कार वाटावा अशीच घटना घडली होती. निरूपणातून आधीच चमत्कारावर ताशेरे ओढले होते.

**'चमत्कार तेथे नमस्कार'** असे सद्‌गुरूगृही नाही व इथे फक्त ज्ञान आणि ज्ञानच बहाल केले जाते व आपणही ज्ञानच घ्यायचं ह्याचीही चर्चा झाली होती.

थोडसं धाडस करून तुषारने विचारले,''तुम्हाला कसं कळलं? तुम्ही म्हणता चमत्कार वगैरे काही नसतं पण हा तर चमत्कारच झाला ना?'' मग माऊलीने आम्हाला पटवून दिले. ती म्हणाली,''जीव देहाला धरतो व देहाच्या आकारापुरता मर्यादीत रहातो. पण जर देहच नाही, **सर्वदूर सर्वत्र सुत्रात्मा मीच आहे.** तर त्याठिकाणी **'मी परब्रह्म'** आहे ना! मग ती जगाच्या पाठीवर कोठेही असली तर आपल्याला कळणारच! पण बाळा, त्यासाठी तितकी तरल अवस्था व्हायला हवी, तितका अभ्यास झाला तर मलाच काय देहबंधनातून सुटलेल्या प्रत्येकालाच हे सहज कळेल. प्रत्येक साधकाला हे सहज शक्य आहे. पण बाळांनो, त्यासाठी साधनेत तत्परता व आपल्या सद्‌गुरूंवर नितांत श्रद्धा हवी.''

अशा रितीने आम्हाला चमत्कारात न अडकवता स्वरूपाचं 'व्यापक' लक्षण माऊलीने प्रत्यक्ष दाखवून दिले.

◈◈◈

**वि.सू. :** 'पाझर' चा अंक इंटरनेटद्वारे वाचण्यासाठी उपलब्ध करावा अशी अनेक साधकांकडून विनंती आली आहे. कृपया यासंबंधी आपले मत कळवा.

छापील प्रत पाहिजे ☐ ई कॉपी पाहिजे ☐

आपले मत 'पाझर'च्या पत्त्यावर/ई मेल द्वारे कळवा

ईमेल पत्ता : pazaramrutr@gmail.com

# व्हॅलेंटाईन्स डे...✍

**- अदिती**

१४ फेब्रुवारी हा **व्हॅलेंटाईन्स डे** म्हणून जगभर साजरा होतो. व्हॅलेंटाईन नावाचे संत होऊन गेले. त्यांनी सर्वांवर प्रेम करायला शिकवले. म्हणून त्यांच्या नावाने हा दिवस साजरा करतात. पण त्यामागची मूळ संकल्पना विसरून प्रेम हे दोन प्रेमी युगुलांमधले आकर्षण याच अर्थाने घेतले जाऊन त्याचे प्रदर्शन करण्यासाठी वेगवेगळ्या वस्तुंचे विक्रेते आणि कंपन्या आपला धंदा करण्यासाठी याचा वापर आणि अवडंबर करतात.

वास्तविक प्रेम ही एक भावना आहे. याच्या नुसत्या जाणीवेने सुद्धा आपण अगदी मोहरून जातो. या विश्वातल्या अनेक व्यक्ती एकमेकांशी **प्रेम** या भावनेने जोडल्या गेल्या आहेत. कुणी आई म्हणून, कुणी वडिल, बहिण, भाऊ, मुले, पत्नी, मित्र, शेजारी म्हणून! नात्याला नाव वेगळे पण जोडणारा धागा स्नेहाचा, प्रेमाचा! कधी कधी अनोळखी माणसाबद्दलही आपलेपणा वाटतो आणि त्याला मदत कराविशी वाटते. का? कारण वरवर बघताना जरी दोन दिसले तरी मीच मला मदत करतोय. ती एकमेकांबद्दल वाटणारी आत्मियता म्हणजे वरून काही असले तरी आतून 'मी' एकच आहे. खरं म्हणजे **'मी'** एकच आहे, माझ्या आत हे विश्व वसलेले आहे. मग कोणी कोणावर प्रेम करायचे?

प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी गुरु व शिष्य हे द्वैत निर्माण करावे लागते आणि महाकारणात आल्याशिवाय हे परब्रह्मीचं प्रेम काय आहे ते शिष्याला अनुभवता नाही येत! म्हणजे गुरुला स्वरूपावरून एक पायरी खाली यावे लागते आणि शिष्याला एक पायरी वर जावे लागते. तरच दोघांमधला तो प्रेमाचा तंतू सूक्ष्म, कोमल, रेशीम धाग्याने बांधला जातो आणि त्याचा परिमल इतरांना अनुभवता येतो.

◈◈◈

# संपादकीय...✍

पहिल्या पावसाची वाट पहाणारा चातक, पावसाळा सुरू झाला की आठवू लागतो. तसेच सुट्टीत येणाऱ्या नृसिंह जयंती उत्सवाची वाट मुले वर्षभर पहात असतात. परिक्षा संपताच केव्हा नी उत्सवाला येऊन दाखल व्हावे केव्हा असे सगळ्यांना होऊन जाते. धमाल, मजा, आनंद असे सर्व काही चाखत चाखतच ज्ञानाचा घास गुरूमाऊली कसा भरवते हे काही कोणाच्या लक्षातही येत नाही. मंदिरात आंनदाला नुसते उधाण आलेले असते. फक्त मुलेच का ? तर नाही सर्व वयीन यात मुलेच होण्याचा आनंद लुटतात. या नृसिंह जयंतीचा आस्वाद या 'पाझर' मध्ये घेता येईल.

खरं म्हणजे आपण कितीही मोठे झालो तरी गुरूमाऊलीच्या पुढ्यात बालकच असतो. अगदी नृसिंह जयंती उत्सवांतील मुलांप्रमाणे'. कारण माउलीकडुन आपल्याला प्रत्येक वेळी काहीना काही शिकायला मिळतेच याचाच प्रत्यय 'अहो ऐकलत का ?' हे सदर वाचताना येईल.

पंचमहाभुते व त्रिगुण कसे निर्माण झाले याचे वर्णन 'सदाचरण'मध्ये आले आहे. हीच अष्टधा प्रकृती तमोगुणी झाली तर तिला त्यातून बाहेर काढायला 'गोजिरवाणी'त शिकविले आहे.

ह्याच अष्टधा प्रकृतिला निर्विकाराकडे आपल्याला न्यायचे आहे. त्यातील अडथळे माउली जाणतेच ! म्हणूनच तर 'विकाराकडून निर्विकाराकडे'ही लेखमाला आपण सुरू केली आहे. त्यातील दुसरा टप्पा मागील 'पाझर'मध्ये पूर्ण झाला. आता तिसरा व अंतिम टप्पा म्हणजेच वासनांवर विजय आपल्याला मिळवायचा आहे. याचेच वर्णन या अंकात आले आहे.

या सर्व अडथळ्यांवर मात केल्यावर जे रूपाला येते त्याचेच वर्णन 'भक्तगाथे'तील श्रीसस बलभीम महाराज करवितात. त्यांच्या चरित्राचा आलेख पहात पहातच आपल्याला पारमार्थिक वाटचाल करायची आहे.

या वाटचालीतच अनेक सुखद धक्के महाराज देत असतात. कस ? ते

या -आठवणींच्या हिंदोल्यावरच आपल्याला अभ्यासातली प्रगति साधायची आहे.

**वि.सु. :**

# उत्सव विशेष...✍

## श्रीदत्तजयंती मार्गशीर्ष १५, २० डिसेंबर २०१०

**मूळपद**

*श्रीदत्तप्रभू श्री अवधूतनाथा। सद्बुद्धी दे श्री स्वामी समर्था।*
*जेणे निरासे संसारभ्रांती। लाभे मनाला शांती।।१।।*
*शरीर हे दुर्बळ व्याधीग्रस्त। असह्य दुःखे मना तापत्रस्त।*
*हे दिव्य शक्ती ही तसेचि तेज। सेवा घडो तव सदा हे एक काज।।२।।*
*दारिद्र्य माझे कधी संपणार। ऐश्वर्य तुझे कधी लाभणार।*
*संपत्ती दैवी मज देई आता। भवपीडिता तू हो एक त्राता।।३।।*
*मातापिता गुरुरूपे त्रैमुर्ति होसी। दया प्रेम आधार भक्तासी देसी।*
*सद्भक्ती दे ज्ञानवैराग्ययुक्त। न हो कदा मी तुजसी विभक्त।।४।।*
*सर्वाठायी आत्मस्वरूप तुझे। कैचे असे मी पण माझे।*
*जेथे नसे जीवपणासी आस्था। दे मुक्ती हे प्रभु तुझी एक सत्ता।।५।।*

## श्रीसस दत्तमहाराज जयंती उत्सव
## पौष शु. ९ ते पौष कृ १ शके १९३२, १३ ते २० जाने. २०११

**मूळपद**

*सद्गुरू पाय तरणोपाय। साधन वाय उपाय अपाय।।धृ।।*
*सद्गुरू हस्त, बोधहस्त। हस्तगत अप्राप्त प्राप्त।।१।।*
*सद्गुरू दृष्टी सर्वात्मदृष्टी। सदैव तुष्टी पुष्टी अपुष्टी।।२।।*
*सद्गुरू वाणी, दावी निर्वाणी। कुंठीत वाणी अकथ्य कथनी।।३।।*
*सद्गुरु हृदय अति सदय। निःसंशय भयाभय।।४।।*
*सद्गुरू कथा, भागिरथी कथा। दत्तपद सत्या स्वार्थास्वार्थ।।५।।*

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

BOOK-POST

To,

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१ दि. १३ जाने ते २० जाने. २०११

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. २८ फेब्रु. ते २ मार्च २०११

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. १६ मार्च ते २४ मार्च २०११

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १४ दि. १२ मे ते १८ मे २०११

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५ दि. ७ जुलै ते १६ जुलै २०११

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. ५ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट २०११

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. ३ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०११

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व १ ते व. ९ |

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न ।।

ज्ञानामृतं भोजनम् ।

# पाझर अमृताचा


नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

◈ वर्ष ७ वे ◈अंक ५वा ◈मार्गशीर्ष – पौष शके १९३२ ◈६ डिसेंबर २०१० ते ३ फेब्रुवारी २०११

**प्रकाशक व मुद्रक:**

**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर

{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}

संपर्क : ९८२०५४९४१५

**प्रकाशनस्थळ :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,

डी–७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,

गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**

**सुदर्शन प्रिंटिंग प्रेस**

१०, वडाळा, उद्योग भवन, वडाळा, मुं – ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**

**सौ. शामला आपटे**


## अंतरंग


◆ **Good Behaviour**
- श्रीसस माधुरीनाथ ०३

◆ गुंजारव - ०५
सौ. प्रतिभा गोखले, अविनाश पाठक

◆ गोजिरवाणी - ०६
सौ. नीता कुलकर्णी

◆ भक्तगाथा - ०८

◆ विकाराकडून निर्विकाराकडे १०
- मुक्ता

◆ अहो ऐकलंत का? - १३
- सौ. प्राची

◆ हरी पाहिला रे - १६
- सौ. रेश्मा

◆ व्हॅलेंटाईन्स डे - १८
- अदिती

◆ उत्सव विशेष - १९